# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.**

दरवर्षी १२ वी परिक्षेचा निकाल मोठया प्रमाणात लागत असलेमुळे कला, वाणिज्य व विज्ञान (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.बी.ए./बी.सी.ए.) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षाकरीता उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेता कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेशाबाबत निर्माण झालेली स्थिती विचारात घेवून विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संदर्भिय पत्रानुसार विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम **(विधी, बी.एड. व बीपीएड वगळून)** आणि पारंपारिक अभ्यासक्रमांकरिता (कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा) कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

i) संबंधित महाविद्यालयाच्या प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरीता सन २०२३-२४ या एकाच वर्षाकरिता महाविद्यालयास शासन मान्य शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.

ii) प्रवेश प्रक्रिया राबवताना शासनाच्या आरक्षण धोरणाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

iii) एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या महाविद्यालयाकडून जादा विद्यार्थी प्रवेश संदर्भात संबंधित महाविद्यालयाने नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

iv) ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पुरतीच मर्यादीत राहील आणि या पोटी शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

टिप :- १) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रू. ७२०/- व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १०% व व्यावसायिक (बी.बी.ए., बी.सी.एस.(बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स (एंटायर), बी.सी.ए. बीडीएस) अभ्यासक्रमांच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रु.१२००/- प्रस्ताव शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल.

२) ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासकीय अनुदान मिळणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

३) वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह दि.१५/०७/२०२३ पर्यत विद्यापीठास सादर करावेत.

४) अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

५) सोबत प्रस्तावाचा नमुना दिलेला आहे. फक्त त्याच नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.

६) ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी क्षमता मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडावी.

कळावे.

आदेशान्वये

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/
दि. 27 JUN 2023
प्रति, No 639 -
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - प्रथम वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **प्रथम वर्षाकरिता ज्यादा विद्यार्थ्यांची आवश्यकता** आहे.

| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अभ्यासक्रमाचे नाव** | **अभ्यासक्रमाचे वर्ष** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **प्रस्ताव प्रकार** | **भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)** |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | ४०% जादा विद्यार्थी | |
| | **बी.ए.** | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | |
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** | | | | | | | |
| i) | नजिकच्या महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत संबंधित महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. | | | | | | | |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**प्राचार्य,**
**(सही व शिक्का)**

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिताच वापरावयाचा आहे.**

F:\23.04.2021\sm\sm\2023-24\Temp Division\Submission.docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - द्वितीय/तृतीय वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आमच्या महाविद्यालयाना खाली नमूद केलेनुसार प्रथम वर्षाच्या मंजूर शेवटच्या तुकडीच्या ४०% विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ मान्यता मिळाली होती. यानुसार सदरचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **द्वितीय वर्षाकरिता प्रवेशास पात्र झाले आहेत. तसेच सन २०२२-२३ मध्ये द्वितीय वर्षामधील विद्यार्थी उत्तीर्ण होवून तृतीय वर्षाकरीता प्रवेशास पात्र झाले आहेत. सबब, आम्हास ४०% जादा विद्यार्थी मिळणे आवश्यक आहे.**

| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रमाचे वर्ष | शासनमान्य मंजूर तुकडी | | मंजूर विद्यार्थी संख्या | | प्रस्ताव प्रकार | भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.) |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | ४०% जादा विद्यार्थी | |
| | **बी.ए.** | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | |
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** | | | | | | | |
| i) | नजिकच्या महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत संबंधित महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. | | | | | | | |
| ii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी कार्यभारानुसार आवश्यक ते शिक्षक तात्काळ भरण्यात येतील याबाबतचे संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| iii) | उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. | | | | | | | |
| v) | मागील शैक्षणिक वर्षात ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता पत्राची प्रत. | | | | | | | |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**प्राचार्य,**
**(सही व शिक्का)**

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिता वापरावयाचा आहे.**

F:\23.04.2021\sm\sm\2023-24\Temp Division\Submission.docx